# Positive Story of Nagpur Rural Police

## दिनांक २४/०६/२०२६

## नागपुर ग्रामीण जिल्हयात जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये सन २०२५ च्या तुलनेत गुन्हेगारी मध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.

मा. श्री हर्ष ए. पोद्दार , वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात नागपुर ग्रामीण पोलीसांनी गुन्हेगारी नियंत्रणात यश संपादन केले आहे. नागपुर ग्रामीण जिल्हयात जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये जानेवारी ते मे सन २०२५ च्या तुलनेत प्रमुख गुन्हयांमध्ये लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे.

**जानेवारी ते मे सन २०२६ मध्ये जानेवारी ते मे सन २०२५ च्या तुलनेत प्रमुख गुन्हयांचा विचार करता सन २०२५ मध्ये २२ खुनाचे गुन्हे दाखल होते तर सन २०२६ मध्ये १० खुनाच्या गुन्हयांची नोंद आहे. ( ५४.५५ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये खुनाच्या प्रयत्नाचे २३ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये २१ गुन्हे नोंद आहे (८.७ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये दुखापतीचे ४५८ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ३४२ गुन्हे नोंद आहे (२५.३३ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये अपहरणाचे ८६ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ७९ गुन्हे नोंद आहे . (८.१४ टक्कयांनी घट झाली आहे). सन २०२५ मध्ये विनयभंगाचे ९५ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ७६ गुन्हे नोंद आहे..(२० टक्कयांनी घट झाली आहे). तसेच सन**

२०२५ मध्ये चोरीचे ६१३ गुन्हे नोंद असुन सन २०२६ मध्ये ४३७ गुन्हे नोंद आहे. (२९ टक्कयांनी घट झाली आहे).

सदर गुन्हेगारीतील ही घट मोक्का (**MCOCA**), एमपीडीए (**MPDA**), हद्दपार कारवाया, कोंबिंग ऑपरेशन्स, आरोपी परेड तसेच विविध प्रभावी प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सातत्यपूर्ण व कठोर वापर केल्यामुळे साध्य झाली आहे.

TheHitavada
Nagpur City Line | 2026-06-25 | Page- 3
ehitavada.com

# Major crimes drop sharply in Nagpur Rural in first five months of 2026

■ Murders down by 55%, theft cases decline by 29%

■ **Staff Reporter**



NAGPUR Rural has witnessed a major decline in major crimes during the first five months of 2026. The police officials attributed the improvement to strict preventive measures and sustained enforcement drives.

According to figures released by the Nagpur Rural Police, crimes such as murder, theft, kidnapping and molestation have registered a noticeable decline between January and May this year compared to the same period in 2025.

Under the leadership of Senior Superintendent of Police Dr Harssh A Poddar and Additional SP Anil Mhaske, the district police have intensified preventive actions which resulted in a marked reduction in serious offences.

The data shows that murder cases dropped from 22 between January and May 2025 to 10 during the corresponding period this year, a decline of 54.55 per cent. Attempt to murder cases also fell slightly from 23 to 21, registering a decrease of 8.7 per cent.

Cases of causing hurt declined from 458 to 342, a reduction of 25.33 per cent. Kidnapping cases came down from 86 to 79, while cases of molestation dropped from 95 to 76, reflecting a 20 per cent decrease.

Theft cases saw one of the biggest drops, falling from 613 in 2025 to 437 this year, a decline of nearly 29 per cent.

Police officials said the decline was achieved through consistent implementation of preventive measures, including action under the Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA), the Maharashtra Prevention of Dangerous Activities Act (MPDA), externment proceedings, combing operations and identification parades. Several other strategies aimed at curbing criminal activities were also carried out during the period. Officials said the same approach would continue in the coming months to maintain law and order and keep crime under control across the Nagpur Rural district.

Powered by Bharati Web

# नागपूर ग्रामीणमध्ये गुन्हेगारीत घट

## हत्याकांड ५४.५५ टक्क्यांनी झाले कमी

**नागपूर, २५ जून**

नागपूर ग्रामीणमध्ये गेल्या पाच महिन्यांत गुन्हेगारीत लक्षणीय घट नोंदविण्यात आली आहे. खून, चोरी, अपहरण, विनयभंग, मारहाण यांसारख्या गंभीर गुन्ह्यांमध्ये २०२५ च्या तुलनेत मोठी घट झाल्याचे नागपूर ग्रामीण पोलिसांनी जाहीर केलेल्या आकडेवारीतून स्पष्ट झाले आहे.

जानेवारी ते मे २०२६ या कालावधीत कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राबविण्यात आलेल्या विशेष मोहीम, सराईत गुन्हेगारांविरोधातील कठोर कारवाया आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम दिसून आला आहे. वरिष्ठ पोलिस अधीक्षक हर्ष पोद्दार आणि अपर पोलिस अधीक्षक अनिल म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली विविध गुन्हे प्रतिबंधक उपक्रम राबविण्यात आले. जानेवारी ते मे २०२५ या कालावधीत नागपूर ग्रामीणमध्ये खुनाचे २२ गुन्हे नोंदविण्यात आले होते. यावर्षी त्याच कालावधीत केवळ खुनाचे १० गुन्हे दाखल झाले आहे. ५४.५५ टक्क्यांची घट झाली आहे. खुनाचा प्रयत्न या प्रकारातील २०२५ मधील गुन्हे २३ वरून २०२६ मध्ये २१ वर आले असून, ८.७ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे. मारहाण आणि दुखापतीसंदर्भातील गुन्ह्यांमध्येही घट झाली आहे. २०२५ मध्ये ४५८ गुन्हे नोंदविले गेले होते, तर २०२६ मध्ये ही संख्या ३४२ वर आली असून २५.३३ टक्क्यांची घट झाली आहे.

### मोक्का आणि कोम्बिंग ऑपरेशनचा परिणाम

पोलिसांच्या मते, संघटित गुन्हेगारीविरोधात महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा (मोक्का), एमपीडीए अंतर्गत कारवाया, हद्दपार प्रक्रिया, सराईत गुन्हेगारांवर लक्ष, नियमित कोम्बिंग ऑपरेशन, आरोपी ओळख परेड तसेच विविध प्रतिबंधात्मक उपाययोजनांमुळे गुन्हेगारीवर नियंत्रण मिळविण्यात यश आले आहे. ग्रामीण भागातील कुख्यात आणि पुनरावृत्ती करणाऱ्या गुन्हेगारांवर पोलिसांनी विशेष नजर ठेवली असून, गंभीर गुन्हे रोखण्यासाठी प्रभावी अंमलबजावणी केली जात आहे. जानेवारी ते मे २०२६ या कालावधीतील आकडेवारीवरून नागपूर ग्रामीण पोलिसांच्या सक्रिय आणि परिणामकारक पोलिसिंगमुळे जिल्ह्यात सुरक्षिततेचे वातावरण निर्माण होत असल्याचे दिसून येत आहे. सराईत आणि संघटित गुन्हेगारांविरोधातील लक्षवेधी कारवायांमुळे गुन्हेगारीला आळा बसत असल्याचे या आकडेवारीतून अधोरेखित झाले आहे.

### विनयभंगाच्या गुन्ह्यांत २० टक्के घट

२०२५ मधील पहिल्या पाच महिन्यांत महिलांविरुद्धच्या विनयभंगाच्या गुन्ह्यांमध्येही घट झाली आहे. २०२५ मध्ये ९५ गुन्हे नोंदविले गेले होते, तर २०२६ मध्ये ७६ गुन्ह्यांची नोंद झाली. यामध्ये २० टक्क्यांची घट झाली आहे. गेल्या पाच महिन्यांत अपहरणाचे ८६ गुन्हे दाखल झाले होते. यंदा ही संख्या ७९ वर आली असून ८.१४ टक्क्यांची घट झाली आहे. चोरीच्या गुन्ह्यांमध्ये सर्वाधिक सुधारणा दिसून आली. २०२५ मध्ये ६१३ चोरीचे गुन्हे नोंदविण्यात आले होते. यंदा ही संख्या ४३७ वर आली असून २९ टक्क्यांची घट नोंदविण्यात आली आहे.

(तभा वृत्तसेवा)



> कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी आणि गुन्हेगारीत आणखी घट घडवून आणण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलिसांनी भविष्यातही प्रतिबंधात्मक अंमलबजावणीच्या कठोर उपाययोजना सुरू ठेवण्याचे ठरविले आहे. ग्रामीण पोलिसांच्या सकारात्मक कामगिरीचा परिणाम दिसून येत आहे.
>
> **- अनिल म्हस्के**
> (अप्पर पोलिस अधीक्षक, नागपूर ग्रामीण पोलिस)